श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

जानेवारी २०२२ | वर्ष-१०, अंक-२ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने १२

## श्रीबाबामहाराज सहस्त्रबुद्धे समाधिमंदिरात डॉ. अच्युत जोशी, वे.मू. गणेश दीक्षित आणि श्री. परशुराम धोत्रे यांचा हृद्य सत्कार



*डावीकडून - श्री. धोत्रे, वे.मू. दीक्षित, वे.मू. फडके गुरुजी, श्रीकाका , श्री. विकासराव वालावलकर, डॉ. अच्युत जोशी, आणि. डॉ. सुवर्णा पाटील*

श्रीसदुरू बाबामहाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिरात, पौष शु।। ३ ते ९, शक १९४३; बुधवार, दि. ५ ते मंगळवार, दि. ११ जानेवारी २०२२ या कालावधीत प्रतिवर्षाप्रमाणे पंचायतन यागाचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी गणेश अथर्वशीर्ष, ब्रह्मणस्पती सूक्त, पंचसूक्त पवमान, विष्णुसूक्त, विष्णुसहस्रनाम, रुद्रसूक्त, रुद्र, मन्युसूक्त, सौरसूक्त, श्रीसूक्त, देवीसूक्त, सप्तशती पाठ, आदी अनुष्ठाने करण्यात आली. त्याचप्रमाणे श्रीमद् भागवत, श्रीमद् अध्यात्म रामायण, चारी वेदांच्या संहितांचे पारायण, श्रीसत्यदत्त पूजा, श्रीगणेश सहस्रनाम, श्रीविष्णुसहस्रनाम, श्रीशिवसहस्रनाम, श्रीदेवीसहस्रनाम, श्रीसूर्यसहस्रनाम आदी पूजा करण्यात आल्या. 'श्रीस्वामी समर्थ जयजय स्वामी समर्थ । हा नामजप आणि अनेक सद्ग्रंथांचे पारायण करण्यात आले.

यज्ञकालात प्रतिवर्षाप्रमाणेच याही वर्षी ''वेदवेदांगचक्रवर्ती वे.मू. कै. दत्तात्रेय पांडुरंग किंजवडेकरगुरुजी आणि याज्ञिकप्रवर वे.मू. कै. लक्ष्मणराव विनायक सप्रेगुरुजी स्मृती समिती'' तर्फे डॉ. अच्युत जोशी, वे.मू. गणेश सांब दीक्षित आणि श्री. परशुराम धोत्रे यांचा सत्कार सोमवार, दि. १० जानेवारी आयोजित करण्यात आला होता.

वे. मू. किंजवडेकरगुरुजी आणि वे. मू. सप्रे गुरुजी या गुरुद्वयाने वेदाध्ययन, अध्यापन, विद्यार्थीवर्गाची जडणघडण आणि वेदसंवर्धनाच्या क्षेत्रात केलेल्या अमूल्य योगदानाविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांच्या शिष्यवर्गातर्फे प्रतिवर्षी हा स्मृती सोहळा साजरा केला जातो आणि त्या निमित्ताने समाजातील विविध क्षेत्रात चांगले काम करणाऱ्या व्यक्तींच्या कार्याला प्रोत्साहन मिळावे या हेतूने त्यांचा शाल, श्रीफळ, मानपत्र आणि सन्मानद्रव्य देऊन सत्कार केला जातो. या सत्कार समारंभाचे अध्यक्षस्थान श्रीकाकामहाराज



श्रीकाकांचे स्वागत करताना वे.मू. मंदार फडकेगुरुजी



वे.मू. वसंतराव फडकेगुरुजी यांचे स्वागत करताना डॉ. जितेन्द्र सप्रे

यांनी स्वीकारले होते. प्रमुख पाहुणे वे.मू. वसंतराव फडके गुरुजी, संस्थेचे प्रमुख विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर तसेच डेरवण रुग्णालयाच्या वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील यांच्या उपस्थितीत झालेल्या या समारंभाचा शुभारंभ ईशस्तवनाने आणि वे.मू. मंदार फडके आणि डॉ. जितेंद्र सप्रे यांनी पुष्पगुच्छ देऊन पाहुण्यांचे स्वागत करून केला.

आपल्या प्रास्ताविक भाषणात वे.मू. प्रसाद निगुडकर या समारंभामागची भूमिका मांडताना म्हणाले की गुरु-शिष्य परंपरा हे आपल्या हिंदू संस्कृतीचे महान वैशिष्ट्य आहे. ती एक व्यापक संकल्पना आहे. या परंपरेमुळेच वेदोपनिषदांची परंपरा अखंड राहिली. या परंपरेचे आपल्यावर फार मोठे ऋण आहे. त्यांच्या उपकारांची फेड करणे शक्य नाही. पण त्यांचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करणे हे आपले कर्तव्य आहे.

वे.मू. किंजवडेकरगुरुजींनी १९६९ साली सुरू केलेली वेदशाळा सरकारी अनुदान बंद झाल्यावर बंद पडते की काय अशी स्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी श्रीसहजानंदसरस्वती स्वामी महाराजांनी १९८३ सालापासून त्या वेदशाळेची सर्व जबाबदारी स्वत: उचलली आणि आज मितीस ती उत्तम रीत्या सुरू आहे. या पाठशाळेचे तीन विद्यार्थी आता घनपाठी झाले आहेत.

यानंतर या वर्षीचे 'वेदसम्राट दत्तात्रेय पांडुरंग किंजवडेकरगुरुजी स्मृति-पुरस्कार' ( रु. ३०००/- आणि प्रशस्ती पत्र) वे.मू. वसंतराव फडके गुरुजी यांच्या शुभहस्ते वे.मू. मंदार महेश पुजारी आणि वे.मू. पुरुषोत्तम रत्नाकर पंढरपुरे यांना प्रदान करण्यात आले. वे.मू. कै. प्रभाकर निगुडकर, वे.मू. वसंतराव फडके गुरुजी आणि वे.मू. प्रकाश दंडगे गुरुजी यांनी आपल्या गुरुजींच्या स्मृती प्रीत्यर्थ हे पुरस्कार प्रायोजित केलेले आहेत.

मंदिरातील याज्ञिक पाठशाळा वे.मू. सप्रे गुरुजींच्या आधिपत्याखाली सुरू झाली होती. त्यांनी घडविलेली याज्ञिकांची पिढी आजही मंदिरातील सर्व याज्ञिक अनुष्ठाने अत्यंत सुविहित पद्धतीने करीत आहेत. प्रतिवर्षी होणारा पंचायतनयाग हे त्याचेच प्रतीक आहे. वे.मू. धनंजय नवाथे यांनी आपल्या या गुरुजींविषयी आपल्या भावना व्यक्त केल्या.

ते म्हणाले, '' तल्लख बुद्धिमत्ता, स्वत:ची प्रगती करून घेण्याची तीव्र आकांक्षा आणि अविरत कष्ट करण्याची क्षमता या सर्व गुणांमुळे सप्रेगुरुजी नावारूपाला आले. मंदिरात अगदी सुरुवातीपासूनच गुरुजी नित्य पूजेअर्चेचे काम पाहू लागले. महाराजांचा विश्वास सार्थ ठरवित ते मंदिराचा अविभाज्य भाग झाले. स्वच्छता, निटनेटकेपणा, शिस्त, वक्तशीरपणा आदी गुणांचे बीजारोपण त्यांनी त्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये केले. त्यांनी धर्मनिष्ठा, सदुरुनिष्ठा आणि ईश्वरनिष्ठेचा आदर्श आपल्या विद्यार्थ्यांसमोर सदैव ठेवला.''

### वे. मू. गणेश सांब दीक्षित यांचा सत्कार

या वर्षीचा 'वे.मू. सप्रेगुरुजी स्मृती पुरस्कार' वे. मू. गणेश सांब दीक्षित (गोकर्ण महाबळेश्वर) यांना देण्यात येत असल्याचे जाहीर करून त्यांचा परिचय वे.मू. निगुडकर यांनी करून दिला.



श्री. विकासराव वालावलकर यांचे स्वागत करताना डॉ. जितेन्द्र सप्रे



डॉ. सुवर्णा पाटील यांचे स्वागत करताना वे.मू. मंदार फडकेगुरुजी



*वे.मू. प्रसाद निगुडकरगुरुजी सूत्रसंचालन करताना*

वे.मू. गणेश सां. दीक्षित यांनी सावंतवाडी येथील संस्कृत पाठशाळेत सुमारे पंधरा वर्षे ऋग्वेद, याज्ञिकी तसेच संस्कृत भाषेच्या अध्यापनाचे काम अत्यंत निष्ठापूर्वक केले. या काळात त्यांनी सुमारे दीडशे विद्यार्थ्यांना ज्ञानदान केले. पाठशाळेत वासंतिक वर्ग सुरू केले. संस्कृत भारतीतर्फे संभाषण कला वर्ग, शालेय विद्यार्थ्यांना आणि आयुर्वेद महाविद्यालयातील प्रथम वर्ष विद्यार्थ्यांना संस्कृत भाषाविषयक मार्गदर्शन, वृक्षारोपण, वेदशास्त्रोत्तेजक सभेतर्फे परीक्षाकेंद्र, असे अनेक उपक्रम त्यांनी केले. वेदशाळेत 'संवत्सर याग' तसेच अन्य अनेक अनुष्ठाने सुरू केली, जेणेकरून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळेल. त्यांनी ओम शान्तिधाम गुरुकुल बंगलोर, दैवरत वैदिक संस्कृत या ठिकाणीही अध्यापनाचे कार्य केले आहे. व्यास महर्षी पुरस्कार, संस्कृत अभ्यास पुरस्कार, वेद विद्वान पुरस्कार, (मुंबई); श्रीपद काळे पुरस्कार-कोल्हापूर अशा अनेक पुरस्कारांनी ते सन्मानित आहेत. कर्नाटक आणि महाराष्ट्रभर अनेक कीर्तन संमेलने आणि वैदिक संमेलनात त्यांना सन्मानाने निमंत्रित करण्यात आलेले आहे. महत्त्वाचे म्हणजे ते 'संस्कृतभारती' आणि 'दक्षिण भारत हिंदी प्रचारसभे'चे कार्य करीत आहेत. मध्यप्रदेश, गोवा येथे त्यांनी भागवत सप्ताहसुद्धा केलेले आहेत. अनेक सभा-संमेलनात त्यांनी आपल्या वक्तृत्वाचा ठसा उमटविला आहे.

या परिचयानंतर वे.मू. वसंतराव फडके गुरुजी यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, मानपत्र आणि सन्मानद्रव्य अर्पण करून श्री. दीक्षित यांचा सत्कार करण्यात आला.

उत्तरादाखल केलेल्या आपल्या भाषणात व्यासपीठावरील सर्व मान्यवरांना अभिवादन करून, विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या अज्ञान रूपी अंधकाराचा नाश करणारे जणू सूर्यच अशा वे. मू. किंजवडेकर आणि वे.मू. सप्रेगुरुजींना प्रणाम करून श्री. दीक्षित म्हणाले, ''गुरुजनांकडून मिळालेली विद्या आणि परमेश्वराकडून झालेली कृपा यामुळे मी समाजात काही कार्य करू शकलो, त्यामुळे आजचा हा माझा सत्कार होत आहे. असे सत्कार समाजाप्रती आपली जबाबदारी आणखीन वाढवतात. त्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्याचे सामर्थ्य सद्गुरूंनी द्यावे अशी त्यांच्या चरणी प्रार्थना. गुरुकुल पद्धतीत पालक आपले पाल्य उपनयनादी संस्कार करून आमच्याकडे पाठवतात. समाजाच्या आणि आईवडिलांच्या अपेक्षेनुरूप त्याला घडविणे हे आपले कर्तव्य असते. विद्यार्थ्यामध्ये जर काही दुर्गुण असतील तर ते समाजाला त्रासदायक ठरतील म्हणून आम्ही त्याला तसाच समाजात परत पाठवू शकत नाही. त्यातून समाजात वाईट संदेश जाईल. समाजातील सर्वांनी आपले आपले संस्कार ब्राह्मणांपासून शिकावे म्हणून त्यांना गुरूचे स्थान दिलेले आहे.

जे ज्ञानासाठी सदैव उत्सुक आहेत त्यांना 'भारतीय' म्हटलेले आहे. जेव्हा रणांगणावर अज्ञानामुळे अर्जुनाच्या अंगाला कंप सुटला त्या वेळी भगवान श्रीकृष्णांनी त्याला भगवद् गीतेतून ज्ञान दिले. त्यामुळे आपण त्यांना जगद्गुरू म्हणतो. जेव्हा अर्जुनाला ज्ञानाची आस निर्माण झाली तेव्हाच त्याला श्रीकृष्णांनी 'भारत' असे संबोधले आहे! ते आपण ज्ञानाची आस असणारे भारतीय आहोत. म्हणूनच हजारो वर्षे आपणावर परकीय आक्रमणे होऊन सुद्धा, लूटमार होऊनसुद्धा आम्ही टिकून आहोत. 'पृथिव्याम् त्रिणी रत्नानी जलमन्नसुभाषितम् ।' अन्न, पाणी आणि चांगले शब्द यांनाच रत्ने म्हणतात. परकीयांनी आपले धन लुटले पण आपले ग्रंथ, आपली शास्त्रे, आपले सद्विचार त्यांना लुटता आले नाहीत! वेद सांगतो की मी तुझा मित्र आहे, म्हणून हे सर्व ज्ञान आपल्याकडे आहे. पण आपण शारीरिक आणि मानसिक स्थितीने त्या जागृत स्थितीला गेले पाहिजे. ही स्थिती प्राप्त होण्यासाठी गुरुजी पाहिजेत. गुरुजींद्वाराच आपणाला जागृत स्थिती प्राप्त होते. जे परमेश्वराबद्दल सतत आत्मियता बाळगतात त्यांचा योगक्षेम परमेश्वर पाहतो.



*वे.मू. दीक्षित यांचा सत्कार करताना वे.मू. मंदार फडकेगुरुजी*



*वे.मू. गणेश सांब दीक्षित सत्काराला उत्तर देताना*

द्रौपदीने जोपर्यंत आपली वस्त्रे आपल्या हाती घट्ट धरून ठेवली होती तोपर्यंत परमेश्वर रक्षणासाठी आला नाही. पण जेव्हा तिने आता तुझ्याशिवाय माझा रक्षणकर्ता कोणी नाही अशी आर्त प्रार्थना केली तेव्हा तिच्या रक्षणासाठी देव धावून आला.

ज्याप्रमाणे आपण आपल्या मोबाईलमध्ये आपणाला आवश्यक तोच संदेश ग्रहण करतो. त्याप्रमाणे परमेश्वराकडून भारतासाठी अनेक उत्तम संदेश प्राप्त होत आहेत. जागतिक स्थितीसाठी ऋग्वेदात अनेक मार्ग सांगितलेले आहेत. आपले मन ही चाळणी आहे. ती चाळणी वापरून विचारांचा स्वीकार करा. आहार, निद्रा, भय, मैथुन हे सर्व पशुपक्षांनाही आहे. आपण आपले घर-दार, बायको-मुले याचाच विचार केला तर आपण ही पुच्छ-विषाणहीन पशूच ठरू. पण माणसाच्या हृदयात परमेश्वर असतो. आपली श्वासोच्छ्वासाची क्रिया तोच करून घेत असतो. आपल्या योगक्षेमाची जबाबदारी तोच घेत असतो. मात्र आपण विवेकाचा वापर करून, स्वार्थासाठी न जगता, जास्तीतजास्त सज्जन राहिले पाहिजे. अग्नीला चुकून जरी हात लागला तरी तो भाजतो. परमेश्वर आपली काळजी आपण गर्भावस्थेत असल्यापासून घेत आहे. माणसाने 'रूपग्राही' नव्हे तर 'गुणग्राही' असले पाहिजे.

मी २००६ सालापासून येथे येत आहे. येथे येऊन मला अतिशय आनंद वाटतो. येथे अतिशय शिस्त आहे. स्पष्ट शब्दात पण मृदू अंत:करणाने श्रीमहाराज येथे मार्गदर्शन करतात.''

### श्री. परशुराम भिमप्पा धोत्रे यांचा सत्कार

श्री. दीक्षित यांच्या सत्कारानंतर वडारवाडी परिसरातील एक सामाजिक कार्यकर्ते श्री. परशुराम भिमप्पा धोत्रे यांचा सत्कार करण्यात आला. प्रारंभी श्री. विजय जोशी यांनी श्री. धोत्रे यांचा परिचय करून दिला आणि मानपत्राचे वाचन केले.

श्री. परशुराम धोत्रे यांचे बालपण मंदिरानजीकच्या वडारवाडीत अतिशय गरिबीत गेले. मात्र लहानपणीच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संपर्कात ते आले आणि त्यांच्या जीवनाला एक वेगळे वळण लाभले. कष्ट करून, दूध-पेपर टाकून त्यांनी पैसे गोळा करून आपले शिक्षण पुढे रेटले. डिझेल मेकॅनिकचे शिक्षण घेऊन त्यांनी कमिन्समध्ये नोकरी केली. मात्र सामाजिक कामाची आवड असल्यामुळे त्यांनी संघ, विश्व हिंदू परिषद, गोरक्षणसंघ अशा अनेक ठिकाणी समाजसेवेचे काम केले. आपल्या समाजातील मुलांना नोकरी मिळावी म्हणून खटपट करून सुमारे सत्तावीस-अठ्ठावीस मुलांना कमिन्समध्येच नोकरी लावून दिली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघात स्वयंसेवक म्हणून गेली ४० वर्षे ते काम करीत आहेतच. शिवाय विश्व हिंदू परिषदेच्या पुणे विद्यापीठ विभागाचे प्रमुखपदही भूषवित आहेत. पं दीनदयाळ उपाध्याय पतसंस्थेत सात वर्षे सचिव म्हणून काम केले आहे आणि आता त्या संस्थेला तज्ज्ञ संचालक म्हणून आपल्या अनुभवाचा लाभ देत आहेत. त्यांनी विश्व हिंदू परिषदेतर्फे ५० रिक्षाचालकांना दिवाळी किटचे वाटप केले आहे. त्यांनी इस्कॉन ट्रस्ट तर्फे करोना साथीचे काळात दररोज ४००० गरीब आणि गरजू लोकांना जेवण वाटपाचे काम केले आहे. त्याचप्रमाणे वडारवाडी भागात साथरोगाचे अरिष्ट दूर व्हावे म्हणून धार्मिक विधींचे आयोजन केले आहे.

मानपत्र वाचनानंतर श्रीकाकांच्या हस्ते श्री. धोत्रे यांचा श्रीफळ, पुष्पगुच्छ, मानपत्र आणि सन्मानद्रव्य अर्पण करून सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना श्री धोत्रे म्हणाले ,'' मी कमिन्समध्ये ३० वर्षे काम करीत आहे. माझे वडील कर्नाटकातले. माझी आई पुण्यातली. वडील खोदाईकाम करायचे. ते काम गेल्यावर ते दारूविक्रीचेही काम करायचे. दहा बाय दहाच्या खोलीत आई, वडील आणि आम्ही चार भावंडे राहात होतो. माझ्या छोट्या बहिणीच्या जन्माच्या वेळी आईचे निधन झाले. तेव्हा मी दीड वर्षाचा होतो.

पुढे माझ्या मोठ्या भावाने आम्हाला घरातून बाहेर काढले. वडील जेथे कामाला होते त्यांनी आम्हाला आश्रय दिला. माझ्या बहिणी धुणीभांड्याची कामे करायच्या तर मी आणि वडील दारूधंद्यावरच राहायचो. या भागातून वडिलांसोबत जाताना आम्ही या मंदिरासमोरून जायचो तेव्हा आम्ही बाहेरूनच नमस्कार करायचो. त्यावेळी वाटायचे की आत जाऊन दर्शन घ्यावे... आणि आज माझा येथे सत्कार होत आहे!



*श्रीकाकांच्या हस्ते श्री. परशुराम धोत्रे यांचा सत्कार*



*श्री. परशुराम धोत्रे यांचे मनोगत*

एका ठेकेदाराने मला कॉर्पोरेशनच्या शाळेत घातले. त्यावेळी वडिलांना माझे आडनावसुद्धा सांगता येत नव्हते. त्या शाळेत मी चौथीपर्यंत शिकलो. त्यावेळी मी भडंग-फुटाणे विकायचो. त्याचे मला साधारणपणे दहा रुपये मिळायचे. सायंकाळी ५ वाजता शाळेतून आल्यावर रात्री १२ वाजेपर्यंत भडंग विकायचे. त्यावर आमची रोजीरोटी चालायची. पुढे सकाळी दूध-पेपर टाकणे सुरू केले. मला चौथीला ९७-९८ टक्के मार्क मिळाले म्हणून संजय रेडके, दिलिप परब हे लोक आले आणि त्यांनी मला 'विमलाबाई गरवारे शाळे'त टाकले. माझ्याजवळ कपडे, पुस्तकांसाठीही पैसे नव्हते. त्यावेळी माझे एक शिक्षक अरुणगिरी गोसावी यांनी माझी ६० रुपये फी भरली. दूध, पेपर टाकून मी माझे दहावीपर्यंतचे शिक्षण कसेबसे केले. पण त्यामुळे माझ्या खूप ओळखी झाल्या. रानडे नावाचे गृहस्थ कमिन्समध्ये होते. त्यांनी मला सांगितले की तू आयटीआय कर. मी तुला कमिन्समध्ये लावतो. त्याप्रमाणे मी डिझेल मेकॅनिकचा कोर्स केला. कमिन्समध्ये लागलो. मला तेव्हा तीनशे रुपये स्टायपेंड मिळे. बहिणींची लग्ने झाली पण त्यांचे संसार सुखाचे झाले नाहीत. वडील दारूधंद्यावरच पडून असायचे. मी जेथे जागा मिळेल तेथे, अगदी एखाद्या रिक्षातही काही वेळा झोपत होतो. मग मी लहानशी जागा घेतली. कामावर ओव्हरटाईम करू लागलो. जोपर्यंत मी कामावर कायम होत नाही तोपर्यंत मी दुधाची लाईन टाकण्याचे काम सोडायचे नाही असे ठरवले होते.

मी समाजात चांगला माणूस म्हणून ओळखला जाऊ लागलो. एका ठेकेदाराने आपल्या मुलीशी माझे लग्न लावून दिले. जागाही दिली. लग्नानंतर दोन महिन्यातच तिच्या दोन्ही किडन्या खराब झाल्याचे लक्षात आले. आठवड्यातून दोनदा डायलिसिसचा खर्च सुरू झाला. मग मी तिला तिच्या माहेरी ठेवले. वडीलही पडून खुबा मोडल्यामुळे अंथरुणावरच होते. या कठीण प्रसंगी संघातील लोकांनी मला धीर दिला. डोके शांत ठेव, घाबरू नको असे सांगितले. वडील आणि पत्नीच्या निधनानंतर मी ही वस्ती सोडून वर्षभर कर्वेनगरला राहात होतो. परंतु संघाच्याच लोकांनी मला पुन्हा उभा केला. दुसरे लग्न करायला लावले. मी बहिणींची वगैरे अडचण पाहून या भागात पुन्हा राहायला आलो. कर्ज काढून येथे जागा घेतली. बहिणी, भावांसाठी शक्य ते केले. पुढे मी पं. दीनदयाळ उपाध्याय पतसंस्थेत सचिव म्हणून काम करू लागलो. विश्व हिंदू परिषदेच्या विद्यापीठ परिसरातील काम मी सुरू केले.

मी २००० सालापासून येथे नामस्मरणाला रात्रौ ११.०० वाजता येत आहे. तीच वेळ मला सोयीस्कर आहे. येथे आल्यापासून माझी उत्तम प्रगती झाली. मी आपणा सर्वांचा ऋणी आहे.''



*श्रीकाकांच्या हस्ते डॉ. अच्युत चंद्रशेखर जोशी यांचा सत्कार*

### डॉ. अच्युत चंद्रशेखर जोशी यांचा सत्कार

डॉ. अच्युत चंद्रशेखर जोशी यांचा परिचय डॉ. सुवर्णा पाटील यांनी करून दिला. त्या म्हणाल्या, ''डॉ. अच्युत जोशी १९८० साली एमबीबीएस झाले तर १९८३ साली ते एमडी (मेडिसिन) झाले. १९८३पर्यंत ससून हॉस्पिटल पुणे येथे रेसिडेंट, १९८५ पर्यंत मुळजीभाई पटेल युरॉलॉजी हॉस्पिटलमध्ये रेसिडेंट फिजिशिअन (renal medicine), १९८६ साली नानावटी हॉस्पिटल मुम्ब्रा, २००० सालापर्यंत भारती विद्यापीठ येथे सहाय्यक प्राध्यापक म्हणून काम केले. Research society of BJMS - दोन वेळा शोधनिबंध सादर, GPCON च्या वार्षिक परिषदेत आठ वेळा भाषणे, रोटरी इंटरनॅशनलचा २०१५चा सार्वजनिक कार्यासाठीचा पुरस्कार. डेरवण हॉस्पिटलला व्हिजिटिग कन्सल्टंट म्हणून दर महिन्याला भेट देत आहेत. सध्या जोशी हॉस्पिटल, पुणे येथे कन्सल्टंट म्हणून कार्यरत.

रुग्णाला कमीतकमी खर्चात जास्तीतजास्त सेवा कशी मिळेल याकडे त्यांचे लक्ष असते. आयुर्वेदात रस असल्यामुळे वडिलांबरोबर आयुर्वेदाचे शिक्षण घेतले आहे. त्यामुळे आयुर्वेद आणि ॲलोपथी याचा तारतम्याने सुरेख संगम करून ते उपचार करतात.

त्यांची खास ओळख म्हणजे ते श्रीसहजानंदसरस्वतींचे डॉक्टर होते. पण तरीही व्यवहार आणि शास्त्र यांची अचूक सांगड घालून उपचार कसे करावे हे मात्र श्रीमहाराजांनीच मला शिकवले असे ते आवर्जून सांगतात. संस्थेचा आर्थिक स्त्रोत हा सात्त्विक असल्याने ते सत्पात्री दान आहे अशी त्यांना पूर्ण कल्पना आहे. डॉक्टरांचा ठाम विश्वास आहे की श्री बाबामहाराज १००० वर्षे येथे राहणार आहेत. म्हणून या निष्काम कर्मयोगाकडे ते आकर्षित झाले. आणि म्हणूनच श्रीमहाराजांनी असा आशिर्वाद असलेले डॉक्टर आपल्या गुरुबंधूंच्या आरोग्याची काळजी घ्यायला निवडले. आणि म्हणूनच कोणी आजारी पडले की नि:शंक होऊन डॉ. जोशी सरांकडे आपण सर्व भार सोपवत आहोत. हॉस्पिटलच्या प्रगतीत त्यांचा बहुमोल वाटा आहे. डेरवण सारख्या खेड्यात १९९६ पासून आम्ही डायलेसिससारखे उपचार त्यांच्याच पुढाकाराने करीत आहोत.

त्यांचा मुख्य गुण म्हणजे त्यांचे निदान करण्यावरील प्रभुत्व हे आहे. श्रीमहाराजांवरील श्रद्धा आणि निर्लोभी वृत्ती आदी गुणांमुळे आज आपण त्यांचा गौरव करीत आहोत.''

मानपत्र वाचनानंतर श्रीकाकांच्या हस्ते डॉ. जोशी यांचा श्रीफळ, पुष्पगुच्छ, मानपत्र आणि सन्मानद्रव्य अर्पण करून सत्कार करण्यात आला.

व्यासपीठावरील सर्व सन्माननीय, समस्त ब्रह्मवृंद आणि उपस्थित प्रेक्षकवर्गाला अभिवादन करून सत्काराला उत्तर देताना डॉ. जोशी म्हणाले, ''१९८४ सालापासून म्हणजे जवळजवळ अडतीस वर्षे मी या स्थानात येत आहे. पण आज पहिल्यांदाच अतिशय अवघडलेल्या स्थितीत, भारावलेल्या मनस्थितीत मी आहे. ८४ साली माझे वडील दिगंबरदास महाराजांची प्रकृती तपासण्यासाठी मला घेऊन आले. त्यानंतर १९८९ साली महाराजांनी देह ठेवीपर्यंत अनेक वेळा त्यांचा सहवास मिळाला. आजचे माझे भाषण म्हणजे महाराजांच्या आठवणी असणार हे उघड आहे. त्याचे कारण म्हणजे माझ्या सांस्कृतिक आणि वैचारिक जडणघडणीमध्ये महाराजांचा फार मोठा हात आहे. यातील अनेक गोष्टी मी येथे व्यासपीठावरून किंवा पुस्तकात सांगितलेल्या आहेत. पण ज्यामुळे माझ्या व्यवसायात विशेष मदत झाली अशा काही गोष्टी मी सांगतो.

एकदा डॉ. मनोहर घारपुरे यांनी महाराजांची शुगर तपासली ती ४००-४५० होती. अशोककाकांनी मला बोलावले. त्याप्रमाणे मी आलो. महाराजांच्या चेहऱ्यावर एवढी शुगर वाढल्याचा काहीही परिणाम नव्हता. दुपारची वेळ होती. त्यांनी माझ्याकडून तपासून घेतले. मी त्याना काही सांगण्याचा प्रयत्न करीत होतो. तेव्हा ते म्हणाले, ''आता जेवायची वेळ झाली आहे, आता जेवू या!'' एप्रिल-मे महिना होता. जेवणात आमरस होता. आम्हाला आग्रह करून महाराजांनी स्वत:ही आमरस खाल्ला. यांना आता ॲडमिट करायला लागते की काय अशी मला भीती वाटू लागली. जेवण झाल्यावर मी घरी गेलो, पण मनामध्ये काळजी वाटत होती. पण शेवटी मी सारे त्यांच्यावरच सोपवून दिले.

दोन दिवसांनी मला घारपुरेंचा फोन आला की तू महाराजांना चांगली ट्रिटमेन्ट दिली आहेस. आता शुगर १५० वर आली आहे. मी मंदिरात येऊन महाराजांना म्हटले की आता आपण याच गोळ्या सुरू ठेवू या. शुगर कमी झाली आहे. त्यावर बाहेर आल्यावर अशोककाका मला म्हणाले की त्यांनी तुमच्या गोळ्या वगैरे काही घेतलेले नाही. परवा तुम्ही गेल्यावर ते जे झोपले ते आज दोन दिवसांनी उठले आहेत. हे मी कोणतीही अतिशयोक्ती करून सांगत नाही आहे! हा मला मिळालेला पहिला धडा होता! पुस्तकी शिक्षण आणि व्यवहार हे फारसे सारखे असतेच असे नाही, हा पहिला धडा!

पुढच्या काळात अनेक वेळा महाराज मला बोलावून घ्यायचे त्यावेळी मला त्यांचा भरपूर सहवास मिळाला. महाराज झोपले असतील तर अशोककाका आणि मी खालच्या बिल्डिंगमध्ये बोलत बसत असू. त्या वेळी झालेल्या संस्कारांचा माझ्यावर प्रचंड पगडा बसलेला आहे.



*एखाद्याला वाटेल की मी महाराजांना ट्रिटमेंट देत असे, तर ते तसे काही नव्हते.*
*महाराज आपले कृपाछत्र माझ्यावर धरण्यासाठी मला बोलावून घेत असत. बाकी काही नाही!*

एक साधे उदाहरण देतो. आम्ही ट्रिटमेंट देतो आणि समोरचा पेशंट बरा होतो याचा अथाअर्थी संबंध असेलच असे नाही! तुम्ही ट्रिटमेंट देता तेथे तुमचे काम संपते. पेशंट बरा होण्यामागचा कार्यकारणभाव काही वेगळाच असतो. आपण ट्रिटमेंट दिली आणि हा बरा झाला (किंवा नाही बरा झाला) हा माणसाकडे 'इगो' असतो. तो अहंकार कमी करण्याचे काम मला श्रीमहाराजांजवळ शिकता आले.

'इंट्युशन'च्या बाबतीत मी आपणाला सांगतो. जे महाराजांच्या अगर काकामहाराजांच्या संपर्कात आलेले आहेत त्यांना हे चांगले पटेल. कुठलीही व्यक्ती दर्शनाला आत येताना ती आत कशी शिरते आहे, ती कशी बोलते आहे, तिची शब्दांची निवड, कोणत्या शब्दावर जोर आहे या सगळ्याकडे महाराजांचे बारकाईने लक्ष असायचे. इंट्युशन दुसरे काहीच नसते. ते हेच असते! तो कोणत्या शब्दात बोलतोय! रात्री दोन वाजता फोन करणारा माणूस आणीबाणीतच असणार! तो कशा भाषेत बोलतोय, त्याची देहबोली! याचा मला गेल्या दोन वर्षात साथीच्या काळात फार उपयोग झाला. प्रत्यक्ष पेशंट न बघता, फोनवर किंवा व्हिडिओकॉलवर किंवा नातेवाईकांनी आणलेल्या रिपोर्टवर मला ट्रिटमेंट देता आली त्याची बीजं महाराजांनी जी देहबोली मला शिकविली त्यात आहेत असे मला वाटते.

महाराज अनेक वेळा मला बोलवायचे. विकासराव, अशोककाका असे आम्ही असायचो. अनेक विषयांवर गप्पा व्हायच्या. कधीकधी रात्री मग कॉफी व्हायची. एखाद्याला वाटेल की मी महाराजांना ट्रिटमेंट देत असे, तर ते तसे काही नव्हते. महाराज आपले कृपाछत्र माझ्यावर धरण्यासाठी मला बोलावून घेत असत. बाकी काही नाही!

माझे वडील आणि आजोबा जेथे व्यवसाय करायचे तेथे मागे एक धन्वंतरीची मूर्ती असे. त्याखाली एक सुंदर श्लोक लिहिलेला असे तो लहानपणापासून माझ्या डोक्यात आहे. आणि आता एवढ्या प्रदीर्घ काळानंतर तो किती अचूक आहे हे मला चांगले पटले आहे. 'क्वचित् अर्थ: क्वचित् मैत्री क्वचित् धर्मो क्वचित् यश:। कर्माभ्यास: क्वचित्श्चेति चिकित्स: नास्ती निष्फल: ।। म्हणजे रोगचिकित्सेतून कधी पैसा, कधी मैत्री, कधी आशीर्वाद कधी कीर्ती काहीतरी मिळतेच. आणि हे समजा नाही मिळाले तरी रोगचिकित्सेचा अभ्यास तर होतोच! म्हणजे चिकित्सा व्यर्थ जात नाही. मी आजही रोज काहीतरी शिकत असतो. फक्त आपले कान आणि डोळे उघडे पाहिजेत!

हे दत्तात्रेयांचे स्थान आहे. महाराजांनी देह ठेवल्यावरही येथे मी दर गुरुवारी येतो. गेल्या ३५ वर्षात माझा गुरुवार चुकलेला नाही. सकाळी १०.३० ते ११.०० पर्यंत काकामहाराजांबरोबर मैफल! काका हे चैतन्यरूपाने महाराजाच आहेत. वेगवेगळ्या विषयांवर येणारी आर्टिकल्स, मेडिकल रिपोर्ट आम्ही काकांना सांगत असतो. त्यावर ते फायनल कॉमेंट देत असतात. त्यातून आम्हाला व्यावहारिक दृष्टिकोन समजतो. ९६-९७ सालापासून डेरवणला महिन्यातून एका रविवारी व्हिजिट सुरू केली. तेथेही खूप शिकायला मिळते. आजूबाजूच्या २००-२५० कि.मी. परिसरातील पेशंट तेथे अन्यत्र सर्वत्र हिंडून येतात. तिथला 'मॉर्टॅलिटी रेट' अत्यंत कमी आहे. 'समहाऊ' तेथे गुंतागुंत होत नाही. जणू काही तेथे एखादी शक्ती असावी अशा तऱ्हेने तेथे वेगवेगळ्या अतिशय गुंतागुंतीच्या केसेस बऱ्या होतात. तेथे काम करीत असताना आमच्या मागे सतत एक शक्ती उभी आहे अशी भावना जाणवते.

तेथे मी मुख्य काय शिकलो, तर आपला देश गरीब आहे, आपल्या साधनसंपत्तीचा वापर योग्य माणसांसाठी करा. तुमच्या क्लिनिकल डायग्नोसिसला, नाडीपरीक्षेला जास्त महत्त्व द्या. कमीत कमी खर्चात त्याला ट्रिटमेंट देऊन त्याचा जास्तीतजास्त फायदा कसा करता येईल यासाठी प्रयत्न करा.

इथे मंदिरात हजारो लोक येतात. मोठे उत्सव होतात, पण येथे कोठेही गडबड, गोंधळ नाही. सर्व मिनिट टू मिनिट सुरू असते. त्याची मुळं अचूक मॅनेजमेंटमध्ये आहेत. तीच मॅनेजमेंट डेरवणला असल्यामुळे रुग्णालयाने वेगाने प्रगती केली आहे. आता त्याने मोठ्या वटवृक्षाचे स्वरूप धारण केले आहे.

आज मी इथे सत्कारमूर्ती म्हणून उभा आहे, त्याचे श्रेय अनेक जणांना आहे. माझी पत्नी आणि मुले यांची मला साथ आहे. त्यांनी कोणतीही अडचण मला येऊ दिली नाही. मी कोणतीही सबब न सांगता, अगदी आंघोळ करीत असताना जरी फोन आला तरी तो घेत असतो.

आणखीन एक आनंदाची गोष्ट म्हणजे मला वे.मू. सप्रे गुरुजींचा सहवास तर लाभला होताच पण किंजवडेकरशास्त्रींचा आणि माझ्या आजोबांचा परिचय होता. ते अनेक वेळा आमच्याकडे आलेले आहेत. तेव्हा मी लहान होतो. पण त्यांचे मोठेपण जाणवायचे! अशा दोन व्यक्तींच्या नावाने हा पुरस्कार मिळतोय, तो ही या मंदिरात आणि अशा ज्येष्ठ, श्रेष्ठ व्यक्तींच्या उपस्थितीत म्हणजे 'सोन्याला सुगंध' असा हा चांगला योग आहे. दिगंबरदासमहाराज आज चैतन्यरूपाने येथे आहेतच. श्रीकाकामहाराजांच्या रूपाने आजही ते सतत पाठबळ देत असतात. वेगवेगळ्या रूपाने संधी देत असतात. त्यामुळे जी काही थोडीफार 'खारीची सेवा' घडली त्याची महाराजांनी पाठीवर दिलेली ही कौतुकाची थाप आहे असे मी मानतो. आणि 'हेची दान देगा देवा । आपला विसर न पडावा।।' आणि येथेच पूर्णविराम न होता या पुढेही महाराजांनी जास्तीतजास्त सेवा करून घ्यावी.''

यानंतर आभारप्रदर्शन आणि वरयाचना पठणाने या सोहळ्याची सांगता झाली.

# सहस्रबुद्धे समाधिमंदिरात चौथा सामुदायिक ऋग्वेद घन पारायण सोहळा

श्रीसद्गुरू बाबामहाराज सहस्रबुद्धे समाधि मंदिर पुणे येथे मिती कार्तिक व।। तृतिया, शक १९४३; सोमवार, दि. २२ नोव्हेंबर २०२१ ते पौष शु, अष्टमी, शक १९४३; सोमवार, दि. १० जानेवारी २०२२ या कालावधीत सामुदायिक ऋग्वेद घन पारायणाचा भव्य सोहळा साजरा झाला. पन्नास दिवस सतत सकाळी ७.०० ते दुपारी १२.३० पर्यंत सुरू असलेल्या या घन पारायणात पुण्यातील आणि बाहेरील एकूण पंधरा घनपाठी विद्वान सहभागी झाले होते.

या घनपारायणाला दररोज सकाळी ठीक ७.०० वाजता श्रीकाकांच्या हस्ते श्रीसरस्वती पूजन आणि ब्राह्मणपूजनाने सुरुवात होत असे. यानंतर ज्येष्ठ-श्रेष्ठ वे.मू. वसंतराव फडके गुरुजी हे पारायण प्रारंभाची द्वयी म्हणून पठणास प्रारंभ करीत.

सतत पन्नास दिवस सुरू असणारे आणि एवढ्या मोठ्या संख्येने घनपाठी ब्राह्मणांनी सामुदायिक रीत्या केलेले हे पारायण ही तशी आजच्या काळातील अत्यंत महत्त्वाची घटनाच ठरली आहे. या काळात भाविकांनी मंदिरात मोठ्या संख्येने या पारायणाच्या श्रवणाचा आनंद लुटला. दि. १० जानेवारी रोजी सर्व विद्वान घनपाठींचा सत्कार करून या कार्यक्रमाची सांगता झाली. वे.मू. वसंतराव फडके गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली या सोहळ्यात सहभागी घनपाठी –

वे. मू. योगेश्वर मनोहर बोरकर, वे. मू. स्वानंद शिवराम धायगुडे,
वे. मू. गिरीश भास्कर मुंडले, वे. मू. मनोज माधव जोगळेकर,
वे. मू. रामचंद्र भास्कर मुंडले, वे. मू. मनीष मंदार पटवर्धन,
वे. मू. वरद योगेश जोशी, वे. मू. माधव व्यंकटेश परांजपे,
वे. मू. हृषीकेश अमित जोशी, वे. मू. सुशिल शांताराम पाटील,
वे. मू. अथर्व संजय पटवर्धन, वे. मू. प्रथमेश रत्नाकर जोशी,
वे. मू. समीर विलास मिराशी, वे. मू. विजयेश गोविंदगुरू सहकारी,



# घन पारायण सोहळा – क्षणचित्रे













# सिंधुदुर्ग जिल्ह्यात आरोग्य शिबिरे

दि. ५ ते ८ जानेवारी २०२२ रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी व वेंगुर्ला तालुक्यातील कोळगाव, माडखोल, आजगाव व आंबोली या गावांमध्ये ल्युपिन फाउंडेशनच्या सहकार्याने भ.क.ल. वालावलकर रुग्णालयाने आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिराला डॉ. आकाश नारायणी, डॉ. ओंकार सांगडे, डॉ. रोहन नागरे, डॉ. अजिंक्य श्रीगावकर, डॉ. दर्शन निचाटे यांच्यासह नर्सिंग आणि रुग्णालयात इतर कर्मचारी शिबिरात सहभागी झाले होते. एकूण ३८२ लाभार्थ्यांनी लाभ घेतला.




*शिबिरात सहभागी रुग्णालयातील कर्मचारी वर्ग*




*रुग्ण तपासणी*



*दिनांक ८ जानेवारी २०२२ रोजी भ.क.ल.वालावलकर रुग्णालयात कोवीड लॅबची स्थापना झाली. सर्व विभागप्रमुख, डॉ. उमेश संतापुरे, डॉ. अस्मिता कर्नाळकर, डॉ.जान्हवी देशपांडे, डॉ. सुवर्णा पाटील व रुग्णालयातील इतर कर्मचारी कार्यक्रमाला उपस्थित होते.*




*डॉ. तासगावकर Associate professor FMT department यांच्या मार्गदर्शनाखाली ६ जानेवारी २०२२ रोजी भ.क.ल.वालावलकर रुग्णालयात मेडीको लीगल सेल विभागाची स्थापना झाली.*

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

# विजयदुर्ग राज्यस्तरीय सागरी जलतरण स्पर्धेत एसव्हीजेसीटी क्रीडासंकुलातील स्पर्धकांची उत्तम कामगिरी



*डावीकडून- प्रेमसागर चव्हाण, तन्मयी जाधव, आरोही पालखडे, विनायक पवार (प्रशिक्षक), श्रावणी वालावलकर, तनिष्क कदम*

**विजयदुर्ग राज्यस्तरीय सागरी जलतरण स्पर्धा दि १२/१२/२०२१ रोजी संपन्न झाली. राज्यभरातून ३८० स्पर्धक यात सहभागी झाले होते. एसव्हीजेसीटी क्रीडासंकुलातील स्पर्धकांची उत्तम कामगिरी खालीलप्रमाणे:-**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| वयोगट : १४ ते १६ मुली | प्रथम | = | श्रावणी वालावलकर | - २ कि.मी. | - ९:३८ (नवा विक्रम नोंदवला) |
| | द्वितीय | = | तन्मई विलास जाधव | - २ कि.मी | - ९:५४ |
| वयोगट : १२ ते १४ मुली | द्वितीय | = | आरोही राजकुमार पालखड | - १ कि.मी. | - ६:२० |
| वयोगट : १९ ते ३० मुले | द्वितीय | = | प्रेमसागर प्रमोद चव्हाण | - ५ कि. मी. | - ३७:५८ |
| वयोगट : १४ ते १६ मुले | तृतीय | = | तनिष्क संदेश कदम | - २ कि. मी | - ८:४७ |

**सर्व यशस्वी स्पर्धकांचे अभिनंदन !**

मालक, मुद्रक, प्रकाशक : श्री. विकासराव वालावलकर यांनी श्रीमुद्रा, १८१, शुक्रवार पेठ, पुणे - २ येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले.
Visit us at https://swamisamarth.com/dervan// संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५,
संपादक मंडळ : सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०